डॉ. राजपूत


# विद्यावार्ता

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

SPECIAL ISSUE-2020 02

Peer Reviewed International Refereed Research Journal









शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम व
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
यांच्या संयुक्त विद्यमाने

## "राजर्षी शाहू, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान" या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

प्राचार्य
डॉ.श्रीकृष्ण चंदनशिव


Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

12) महात्मा जोतिबा फुले यांचे शैक्षणिक विचार ||50
डॉ. राखी सिताराम सलगर, औरंगाबाद

13) राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा ||52
प्रा. सिसोदीया प्रदीप बन्सीधर, हदगांव

14) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार ||54
डॉ. राजाराम सोनटक्के, बीड

15) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मविषयक विचार ||57
प्रा. डॉ. सुनिल रजपूत, उस्मानाबाद

16) इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या विकासात मुद्रीत माध्यमांची भूमिका ||59
सरला माईक, औरंगाबाद

17) महात्मा फूले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्यविषयक विचार ||63
प्रा. डॉ. सुर्यवंशी रामहरी मधुकर, उस्मानाबाद

18) महात्मा फुले यांचे स्त्रीविषयक विचार ||65
प्रा. डॉ. पवार विद्युलता शाहूराव, कळंब

19) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जलव्यवस्थापन विषयक विचार ||67
नवनाथ विश्वनाथ खेत्री, औरंगाबाद

20) राजर्षी शाहू महाराज आणि सत्यशोधक विचार ||70
शेख शहारुख फारुख, बीड

21) महात्मा जोतीबा फुले यांचे कृषि विषयक विचार ||72
योगेश रामकृष्ण वायाळ, औरंगाबाद

22) राजर्षी शाहू महाराजांचे स्त्रीविषयक कार्य आणि सद्यस्थिती ||74
श्रीमती. प्रा. मडके साधना हरिदास, उस्मानाबाद

23) छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य ||76
प्रा. श्रीमती सरवदे वर्षा तात्यासाहेब, उस्मानाबाद

24) छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे आरक्षण विषयक विचार ||78
अधिकराव महारु पाटील, जळगाव

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

16

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मविषयक विचार

प्रा. डॉ. सुनिल रजपूत
जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर
ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

**प्रस्तावना :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२७ ते १९३५ या कालखंडात हिंदू धर्मांतर्गत समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. हा कालखंड अस्पृश्यांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी हिंदू धर्मांतर्गत समता संघर्षाचा कालखंड होता. या कालखंडात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांना इतर हिंदू माणसाप्रमाणे विविधप्रकारचे मानवी हक्क मिळवून देण्यासाठी स्पृश्य हिंदू विरूध्द संघर्ष केला. पण स्पृश्य सनातनी लोकांच्या विरोधामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मूळ हेतू साध्य होऊ शकला नाही. उलट त्यांना आणि त्यांच्या अनुयायांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. या सवर्ण हिंदूंनी अस्पृश्यांचे न्याय हक्क तर मान्य केले नाही तर उलट अस्पृश्यांवर सवर्ण सनातनी हिंदूंनी सामाजिक व आर्थिक बहिष्कार टाकून त्यांना जीवन जगणे अशक्य करून टाकले. आपण संघर्ष करून अस्पृश्यांना इतर हिंदूप्रमाणे न्याय हक्क मिळवून देऊ अशी बाबासाहेबांची कल्पना होती. हिंदूंची सद्सद्विवेकबुध्दी जागी होऊन ते अस्पृश्यांचे मानवी हक्क मान्य करतील अशी त्यांची कल्पना होती. परंतू सवर्ण हिंदूंनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे बाबासाहेबांचा सवर्ण हिंदूंच्या सद्सद्विवेकबुध्दी वरील विश्वास उडाला. त्यासाठी ते वेगळ्या मार्गाचा विचार करू लागले. व शेवटी नाशिक जिल्ह्यातील येवला येथे भरलेल्या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर करण्याची १३ ऑक्टोबर १९३५ ला घोषणा केली. आणि पुढे १४ ऑक्टोबर १९५६ ला नागपूर मुक्कामी आपल्या लाखो अनुयायांसह बौध धर्माचा स्विकार केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर ही एक भारताच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची घटना आहे. माणूसकीचे हक्क मिळविण्यासाठी अस्पृश्यांनी बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली चालविलेल्या चळवळीच्या इतिहासातील धर्मांतराची घटना निर्णायक घटना आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर अचानकपणे व घाईघाईने केले नाही. तर धर्मांतराची घोषणा १३ ऑक्टोबर १९३५ रोजी केली. पण धर्मांतर प्रत्यक्षात १४ ऑक्टोबर १९५६ रोजी केले. म्हणजे जवळ जवळ २१ वर्ष बाबासाहेब धर्मांतराची घोषणा करून प्रत्यक्षात धर्मांतर करण्यासाठी थांबलेले दिसतात. या काळात त्यांनी धर्मांतरासंबंधी सखोल व सर्वांगीण अभ्यास केलेला पहावयास मिळतो. म्हणूनच बाबासाहेबांचे धर्मांतर हे सखोल विचारांती केलेले धर्मांतर आहे.

**धार्मिक संस्कार :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करून बौध्द धर्माचा स्विकार केला. डॉ. आंबेडकर हे विवेक आणि विज्ञानाचे उपासक होते. त्याच प्रमाणे ते धर्माला मानणारे महान विद्वान होते. त्यांच्या जीवनात धर्माला असाधारण महत्व होते. माणसाच्या सद्गुणांच्या विकासासाठी धर्माची आवश्यकता असल्याचे ते नेहमीच मान्य करीत असत. त्यांनी असे म्हटले आहे की- "धर्म हा समाजाला आवश्यक नाही, असे लोक समजतात माझा तसा दृष्टिकोन नाही. धर्माचा पाया व्यक्तिजीवनाला आवश्यक आणि सामाजिक व्यवहाराला पोषक आहे."

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा धर्माकडे पाहण्याचा जो दृष्टिकोन लक्षात येतो. तो त्यांच्यावर बालपणी व विद्यार्थी दशेत झालेल्या धार्मिक संस्कारांचा परिपाक असल्याचे लक्षात घेतले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर त्यांच्या बालपणी व विद्यार्थी दशेत जे धार्मिक संस्कार त्यांच्या वडिलांनी केले, त्यातूनच त्यांची धर्मासंबंधीची गाढ श्रध्दा आकारात आली.

**डॉ. बाबासाहेबांचे तीन गुरू :-** दिनांक २८ ऑक्टोबर १९५६ रोजी मुंबईतील पुरंदरे स्टेडियममध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे एक भाषण केले होते. त्या भाषणात त्यांनी आपले आयुष्य आपल्या तीन गुरू आणि तीन उपास्य देवतांनी कसे घडविले यासंबंधी आपले विचार व्यक्त केले होते. त्या भाषणात ते म्हणाले "माझे तीन गुरू आहेत. प्रत्येकाला गुरू असतात. माझे पहिले आणि श्रेष्ठ गुरू बुध्द होय." माझे वडील कबीर पंथीय साधू होते. तसेच ते विठ्ठलाचे भक्त होते. व धर्माचे चाहते होते. दादा केळूसकरांनी एक बुध्दाच्या चरित्राचे पुस्तक बक्षीस दिले. ते वाचल्यानंतर माझ्यात काही निराळाच प्रकार घडला. व त्या धर्माची पकड माझ्या मनावर कायमची बसली आहे.

दुसरे माझे गुरू कबीर होय. माझे वडील कबीरपंथीय होते. त्यामुळे कबीराच्या जीवनाचा आणि तत्वाचाही माझ्यावर फार मोठा परिणाम झाला. माझ्या मताप्रमाणे कबीराला बुध्दाच्या तत्वज्ञानाचे खरे रहस्य कळले. मी मोठा कोणालाच म्हटले नाही. गांधीला मी महात्मा म्हटले नाही. कारण कबीराने म्हटले आहे की, "माणूस होता



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

कठीण है। तो साधू क्या बन" जो माणूस झाला नाही. तो महात्मा कसा होईल?

आणि माझे तिसरे गुरू म्हणजे ज्योतिबा फुले होय. ब्राम्हणेतरांचे खरे गुरू ते होते. शिंपी, कुंभार, न्हावी, कोळी, महार, मांग, चांभारांना माणुसकीचे धडे फुल्यांनीच दिले आणि शिकवले. हे असे माझे तीन गुरू आहेत. त्यांच्या शिकवणीने माझे आयुष्य घडले आहे.[1]

येथे बाबासाहेबांच्या तीन गुरूंच्या शिकवणीचाच उल्लेख केलेला आहे. त्यांच्या तीन उपास्य दैवतांचा उल्लेख केलेला नाही. आपण बाबासाहेबांवर त्यांच्या बालपणी व विद्यार्थी दशेत, कोणी कोणत्या प्रकारचे धार्मिक संस्कार केले अथवा प्रारंभीच्या काळातील बाबासाहेबांची धार्मिक जडणघडण कशी झाली. त्यातून बाबासाहेबांच्या जीवनात धर्माला महत्वाचे स्थान कसे प्राप्त झाले यासंबंधी माहिती पाहत आहोत. त्या दृष्टिनेच -

त्यांच्या तीन गुरूंनी विशेषतः भगवान गौतम बुध्दाच्या कबीराच्या शिकवणीतून त्यांचा धार्मिक पिंड कसा तयार झाला हे समजून घेणे आवश्यक आहे. वडिलांनी रामायण व महाभारत बाबासाहेबांकडून त्यांच्या बालपणीच वाचून घेतले. त्या धार्मिक ग्रंथातील घटनांचा बाबासाहेबांवर परिणाम झाला. धार्मिक विषयाची त्यांना गोडी वाटू लागली. आणि हीच गोडी पुढील काळात पाहावयास मिळते.

कबीराच्या सामाजिक क्षमतेच्या शिकवणीचा, त्यांच्यावर परिणाम झाला. गौतमबुध्दाच्या शिकवणीचे मोठेपण त्यांच्या मनावर कायमचे ठसले. दोहे, अभंग, भजन यामधुन त्यांच्या धार्मिक संस्काराचे संस्करण झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा धार्मिक पिंड यामधूनच निर्धारीत होण्यास निश्चितपणे मदत झाली. याच धार्मिक संस्कारातून बाबासाहेबांना कायमचे धर्मासंबंधीचे जबरदस्त आकर्षण व कायमची ओढ निर्माण झाली. त्यामुळेच जेंव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धार्मिक भाव-भावनांची पूर्तता हिंदू धर्म करू शकत नाही, अशी त्यांची खात्री झाली तेव्हा त्यांनी बौध्द धर्माचा स्विकार केला. धर्म आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे- असे त्यांनी आयुष्यभर मानले.

**धर्माचा अर्थ आणि महत्व :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना धर्मासंबंधीचे जबरदस्त आकर्षण व ओढ बालपणापासूनच वाटत होती. पण त्यांना अभिप्रेत असणारा धर्म पूजा, अर्चा, नवस, यज्ञ, कर्मकांड, तपश्चर्या यावर अधिष्ठित नव्हता. धर्माचा अर्थ विशद करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे म्हटले आहे की, "माणसामाणसात जो धर्म पंक्तिप्रपंच करतो, कोट्यावधी लोकांना त्यांच्या स्वतःच्या अपराध नसता, गुन्हेगारांसारखे वाईट रीतीने वागवितो, विशिष्ट वर्गातील लोकांना पिढ्यानपिढ्या परलोकाच्या मरण यातना भोगावयास लावतो, माणूस असून ही त्यांना जनावरांनाही मिळणा-या सवलती मिळत नाहीत तो धर्म कसला, तसा धर्मास धर्म हे नावच शोभत नाही."[1]

हिंदू धर्म अस्पृश्यांच्या अभ्युदयाच्या मार्गात निश्चितपणे अडचणी निर्माण करतो. अस्पृश्यांना आपली उन्नती साध्य करून घेण्याच्या मार्गात अडथळे निर्माण करतो. त्यांना माणुसकीचे हक्क नाकारतो. नागरी हक्कांपासून अस्पृश्यांना हिंदू धर्म वंचित ठेवतो. त्यामुळेच बाबासाहेबांनी हिंदू धर्मावर टीका केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीने धर्माचे प्रमुख कार्य व्यक्तिगत व सामाजिक आदर्श उभा करणे हे असते. ते म्हणतात की, "माणसे ज्या समाज व्यवस्थेत जगतात तिची नीतीवर आधारलेल्या व्यवस्थेच्या दिशेने प्रगती व्हावयाची असेल तर नीतीनिष्ठ अशा आदर्श व्यवस्थेचे स्वरूप कोणते असावे याची त्यांना कल्पना असली पाहिजे, ही कल्पना त्यांना आणून देणे हे धर्माचे कार्य होय"[1]

वरील विधानावरून असे स्पष्ट होते की, बाबासाहेबांना नीतीनिष्ठ समाजव्यवस्थेचे स्वरूप कोणते असावे हे स्पष्ट करणे धर्माचे कार्य असते, समाजाचे नैतिक अधिष्ठान निर्धारीत करणे हे धर्माचे प्रमुख कार्य असते असे वाटे. धर्म समाजाला नैतिक अधिष्ठान मिळवून देऊ शकत असल्यामुळे त्यांच्या दृष्टीने धर्म अत्यंत महत्वाची बाब आहे.

या संदर्भात बाबासाहेबांचा धर्माकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट करताना नलिनी पंडीत यांनी असे म्हटले आहे की, "समाजसंघटनेचा हेतू व्यक्तीची उन्नती अथवा सौख्य नसून आदर्शभूत समाज तयार करणे हा होय, असे मानणा-यांचाही एक पंथ आहे. पण व्यक्तीला प्राधान्य नाही, ही विचार प्रणाली आंबेडकरांना मान्य नव्हती. व्यक्तीच्या विकासासाठी तीन गोष्टींची आवश्यकता असते. त्या म्हणजे सहानुभूती, समता व स्वातंत्र्य या होत. ही मूल्ये ज्या धर्मामध्ये असतील तोच धर्म श्रेष्ठ होय अशी आंबेडकरांची याबाबतची भूमिका होती."[1]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर धर्माला सामाजिक दृष्टीने देखील महत्व देत असल्याने धनंजय कीर यांनी आपल्या "आंबेडकर मॅन अ‍ॅण्ड मिशन" या ग्रंथाच्या पृ. क्रं. ५८ वर स्पष्ट केले आहे. बाबासाहेबांच्या मतानुसार धर्म सामाजिक व्यवहाराला पोषक असलेले धार्मिकतत्वज्ञान आहे. व्यक्तिच्या दृष्टीनेही धर्म गरजेचा आहे. असे बाबासाहेबांना वाटत असल्याचा अभिप्राय श्री धनंजय कीर यांनी दिला आहे. बाबासाहेब धर्माला किती महत्व देत होते हे त्यांच्या दलित वर्गीय तरूणांच्या एका परिषदेतील भाषणावरून लक्षात येईल.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

या भाषणात बाबासाहेब म्हणाले की, "आपल्या लोक धर्मातीलची भीषणता धक्का बसवले आहेत. हे पाहून मला दुःख होते. भाबडे लोक समाजात त्याचे धर्म ही अकृषी मोठी नाही. मुख्यात ज्या सांगल्या गोष्टी आहेत किंवा ज्याच्या शिकवणाचे काढले समाजाला वाचेत आणि जे मला वाटते ते ज्याच्यात असलेल्या धार्मिक भावनेमुळेच होय. म्हणून धर्म पाहिजे पण धर्माच्या नावावर चाललेला ढोंगीपणा मला नको आहे."५

थोडक्यात सद्गुणांची निर्मिती धार्मिक शिक्षण व संस्कारातून होऊ शकेल असे बाबासाहेबांना वाटत असल्यामुळे त्यांनी धर्माला महत्त्व दिल्याचे आपल्या निदर्शनास येते.

**संदर्भ सूची -**

१. "माझे आयुष्य तीन गुरू आणि उपास्यदैवतांनी घडले आहे." दि. २८/१०/१९५४ रोजीच्या मुंबईतील पुरंदरे स्टेडियमवर झालेले भाषण "जनता" दि. ०६/११/१९५४
२. धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पृ. क्र. १६, तिसरी आवृत्ती. १९८१ पॉप्युलर प्रकाशन
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर- राईटींग अँण्ड स्पिचेस खंड- ३, पृ. क्र. २३, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
४. नलिनी पंडीत : आंबेडकर, पृ. क्र. १५४, पहिली आवृत्ती १९९६, ग्रंथाली, वावरेकर मार्ग, दादर (प) मुंबई.
५. धनंजय कीर : आंबेडकर मॅन अँण्ड मिशन, पृ. क्र. ३०४

□□□

18

# इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या विकासात मुद्रीत माध्यमांची भूमिका

सरला गायक
एम.ए. (एम.सी.जे.), एम.फिल. (एम.सी.जे.),
जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**प्रस्तावना :**

आधुनिक समाजात प्रसारमाध्यमांचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे व भविष्यकाळात ते वाढत राहणार आहे. प्रसार माध्यमे या संकल्पनेत वृत्तपत्रे, मासिके, ग्रंथ माध्यमे तर नभोवाणी व दूरचित्रवाणी दृकश्राव्य माध्यमे समाविष्ट केली जातात. तसेच पारंपरिक लोककलांचा विकसनशील राष्ट्रातील समाज जीवनावर अजूनही पगडा असल्यामुळे ही मौखिक व कलात्मक माध्यमे सुध्दा ग्रामीण व आदिवासी तसेच डोंगराळ, वनवासी भागात अद्यापही प्रभावशाली आहेत. विचार प्रसारण करण्याचे सामर्थ्य असलेल्या कोणत्याही अभिव्यक्ती साधनास प्रसार माध्यमे म्हणता येईल. आधुनिक युगात इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे महत्व वाढले असून प्रसारणाला चौथी सत्ता म्हटले जात आहे.

**इतर मागास प्रवर्गाचा इतिहास :**

स्वातंत्र्यानंतर भारताची नवी राज्यघटना अस्तित्वात आली. राज्यघटनेचे उद्दिष्टच मुळी समता स्थापण्याचे हे लक्षात घेऊन राज्यघटनेत १६(४) व ३४० कलमे समाविष्ट करण्यात आली. १६ (४) कलमानुसार देशातील अनु. जाती जमातींना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रशासनातील राखीव जागांचा अधिकार मिळाला. कारण अजू.जाती-जमातीमध्ये समाविष्ट होणारे जातीवर्ग ठळक दिसणारे होते. म्हणून त्या वर्गातील जाती वर्गाची यादी तावडतोब तयार होऊ शकली व त्यांच्यासाठी केलेली घटनात्मक तरतूद अंमलातही आली. पण अन्य मागासवर्गीयांबाबत तशी परिस्थिती नव्हती. पण हे अन्य मागासवर्गीय म्हणजे नेमके कोण? त्यासाठी घटनेत ३४० वे कलम आले. त्यानुसार देशातील "सामाजिक शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले वर्ग" कोणते आहेत त्यांची पाहाणी करुन त्यांच्या अडचणी दूर करण्याचे उपाय सुचविण्यासाठी आयोग नेमण्याची जबाबदारी राष्ट्रपतीकडे सोपविण्यात आली. ३४० कलमानुसार राष्ट्रपती अन्य मागासवर्गीयांना विशेष संरक्षण पुरविण्यासाठी आयोग नेमून त्या आयोगाच्या शिफारशी



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad